मार्गदर्शक_सुचना

जा.क्र. कृउस७/कृ.यां./राज्य हिस्सा/मासू./५६/१२
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, साखर संकुल,
शिवाजीनगर, पुणे४११ ००५
(Email ID – ddappscptsp@rediffmail.com )
दिनांक १५/१/२०१३

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

२) विभागीय कृषि सह संचालक,
विभाग (सर्व)

विषयः सन २०१२१३ मध्ये कृति आराखडयांतर्गत केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेशी संलग्न प्रोत्साहनपर (२५ टक्के) राज्यहिस्सा अर्थसहाय्य देण्याची योजनाबाबत मार्गदर्शक सुचना

संदर्भ : 1. आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना क्र. कृउसविप्र७कृया/मासु/४१९/दि.११/५/२०१२
२. शासन निर्णय क्रमांक कृयायो/१६१२/रा,हि./प्र.क्र.१८३/४अे/.दि१३/७/२०१२ व ९/८/२०१२
३. आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सुचना क्र. कृउसविप्र७कृया/सुमासु/६७६/दि.३१/७/२०१२
३. शासन निर्णय क्रमांक कृयायो/१६१२/रा,हि./प्र.क्र.१९९/४अे/.दि ३ जानेवारी २०११

उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयानुसार कृति आराखडयांतर्गत केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनशी संलग्न प्रोत्साहनपर (२५ टक्के) राज्य हिस्सा अर्थसहाय्य देण्याची योजना सन २०१२१३ राबविण्यासाठी शासनाने मान्यता दिलेली आहे. शासन निर्णयानुसार योजनेच्या अंमलबजावणी करीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. सोबत दिलेल्या मार्गदर्शक सुचना नुसार योजनेची अमंलबजावणी करण्यात यावी. मार्गदर्शक सुचनांची प्रत विभागाच्या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहे याची कृपया नोंद घ्यावी.

**स्वाक्षरीत/**
**संचालक**
**विस्तार व प्रशिक्षण**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रति,**

१) मा. प्रधान सचिव, (कृषि व फ़लोत्पादन) कृषि पदुम, मंत्रालय विस्तार विभाग, मुंबई३२. यांना माहितीस्तव सादर.
२) कक्ष अधिकारी, ४अे, कृषि पदुम मंत्रालय, विस्तार मुंबई३२ यांना माहितीस्तव अग्रेषित.
३) मा. व्यवस्थापकीय संचालक,
अ) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ, राजन हाऊस, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५
ब) महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, कृपानिधी, ९ वालचंद हिराचंद मार्ग, बालार्ड इस्टेट, मुंबई४०० 001
क) महाराष्ट्र स्टेट कोऑपरेटिव्ह मार्केटिंग फेडरेशन लि., कमनूर हाऊस, नरसी नाथा स्ट्रीट, मुंबई४०० ००९
४) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व) यांना माहितीस्तव पुढील आवश्यक कार्यवाहीस्तव.
५) कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व) आवश्यक कार्यवाहीस्तव.
६) महाव्यवस्थापक (कृ.अ.), महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, कृषि उद्योग भवन, दिनकराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगाव(पूर्व) , मुंबई६५

**कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत प्रोत्साहन पर (२५ टक्के) अर्थसहाय्याची योजना सन २०१२१३**

**मार्गदर्शक_सुचना**

राज्यात कृषि यांत्रिकीकरणास चालना देण्याचे ष्टीने कृती आराखडयांतर्गत केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजनेत विविध कृषि औजारांचा औजारे प्रकारनिहाय २५ टक्के ते ५० टक्के अनुदानावर शेतकऱ्यांना पुरवठा करण्यात येतो. राज्यातील कृषि यांत्रिकीकरणाची वाढती मागणी विचारात घेता व कृषि उत्पादन वाढीतील खर्चात बचत करण्याचे ष्टीने कृषि औजारांचे अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता, केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत ज्या औजारांना ५० टक्के पेक्षा कमी अनुदान अनुज्ञेय आहे अशा औजारांबाबत राज्य शासनाच्या प्रोत्साहनपर हिश्यातून अतिरिक्त अनुदान देवून सन २०१२१३ मध्ये कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत सर्व कृषि औजारांना सरसकट ५० टक्के अनुदान देण्याचे ष्टीने शासन निर्णय क्रमांक कृयायो/व्हिडॉ१६१२/रा.हि./प्र.क्र.१८३१/४अे, दि ३ जानेवारी २०१३ नुसार रुपये १०७३.९३ लाख (रु.दहा कोटी त्र्याहत्तर लाख सत्याणव हजार फक्त) च्या कार्यक्रमास शासनाची प्रशासकीय व वित्तीय मान्यता देवून निधी मुक्त केलेला आहे. सदर योजना राबविण्यासाठी मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरण योजनांतर्गत केंद्र शासनाने विविध कृषि औजारे व सयंत्रे याकरीता अनुज्ञेय केलेले अनुदान विचारात घेता त्यामध्ये राज्य शासनाचा प्रोत्साहनपर सहभाग वाढविल्यास शेतकऱ्यांना सदरची औजारे खरेदी करुन त्याचा वापर शेतीमध्ये करणे शक्य होईल या ष्टीने कृषि यांत्रिकीकरण या कृषि आराखडयातील केंद्र शासन पुरस्कृत योजनेमध्ये राज्य शासनाचा सहभाग वाढविण्याचे प्रस्तावीत होते. त्याकरीता सन २०१२१३ मध्ये केंद्र शासनाच्या योजने अंतर्गत ज्या औजारांना ५० टक्के पेक्षा कमी अनुदान अनुज्ञेय आहे अशा औजारांबाबत राज्य शासनाच्या प्रोत्साहनपर हिश्यातून अतिरिक्त अनुदान देवून कृषि यांत्रिकीकरण योजनांतर्गत सर्व कृषि औजारांना सरसकट ५० टक्के अनुदान देण्याचे ष्टीने राज्य शासनाचा सहभाग म्हणून सोबतच्या यादीत नमुद केलेल्या औजारांना केंद्र व राज्य शासनाचे मिळून एकूण ५० टक्के अनुदान मर्यादेत अनुज्ञेय राहील.

सन २०१२१३ करीता कृति आराखडयांतर्गत केंद्र पुरस्कृत कृषि यांत्रीकीकरणाची योजना राबविण्याबाबत मार्गदर्शक सुचना आयुक्तालयाचे पत्र क्र. कृउसं/वि.प्र७/कृ.या./सुमासू/४१९/१२, दि.११ मे २०१२ व दि.३१/७/२०१२ नुसार निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार सदर योजनांतर्गत निवड केलेल्या सर्व लाभार्थ्यांना सदर औजारांसाठी तक्त्यात दर्शविल्यानुसार प्रोत्साहनपर राज्यहिस्सा अनुदान अनुज्ञेय राहील. यापूर्वीच्या मार्गदर्शक सुचनेनुसार अनुदान समायोजन प्रस्ताव विहीत प्रपत्रात महाराष्ट्र राज्य कृषि उद्योग विकास महामंडळ, मुंबई यांना सादर करावेत. त्यांनी कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचे कडून प्राप्त होणाया अनुदान समायोजन विवरण पत्रात दर्शविलेल्या लाभार्थ्यांचे नावानुसार धनादेश संबधीत कृषि विकास अधिकारी यांचेकडे वितरणासाठी पाठवावेत. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडून अनुदान समायोजन विवरण पत्रातील मंजूर केलेल्या अनुक्रमांकानुसार अर्थीक मर्यादेत प्रस्तांवाचे अनुदान समायोजन करणे बंधनकारक राहील. लाभार्थी शेतकऱ्यांचे अनुदानापोटी देय रकमेचे धनादेश कृषि विकास अधिकारी यांचे मार्फतच वितरीत करण्यात यावेत. महामंडळस्तरावर अनुदान रकमेच्या झालेल्या समायोजनाचा तपशील दरमहा संबंधीत कृषि विकास अधिकारी व कृषि आयुक्तालयास कळविण्यात यावा. इतर पुरवठादार सस्थांकडील प्रस्तावांची देय रक्कमही क्रमाने व वेळेवर वितरीत करण्याची कृपया दक्षता घ्यावी. अनुदान समायोजन विवरण पत्राची प्रत कृषि उपसंचालक (वि.प्र.७), कृषि आयुक्तालय यांचेकडे माहितीसाठी पाठवावी. याबाबत आयुक्तालयाच्या इतर सर्व मार्गदर्शक सुचना जशाच्या तशा लागू राहतील. डिझेल/इलेक्ट्रीक पंपसेट साठी केंद्र शासनाचे ५० टक्के अनुदान अनुज्ञेय असल्याने त्यासाठी प्रोत्साहनपर अनुदान अनुज्ञेय नाही याची कृपया नोंद घ्यावी.

**औजारनिहाय केंद्र हिस्सा व राज्य शासनाचे प्रोत्साहनपर अनुदान व एकूण अनुदान मर्यादेचे प्रपत्र**

| अ. क्र. | बाब | केंद्र शासनाची उच्चतम अनुदान मर्यादा (रु.) | | राज्य शासनाचे प्रोत्साहनपर अनुदानाची उच्चतम मर्यादा (रु.) | | केंद्र व राज्य मिळून एकूण उच्चतम अनुदान मर्यादा (रु.) | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अनुदानाची टक्केवारी (किंमतीच्या) | कमाल आर्थिक मर्यादा (रु.) | प्रोत्साहनपर अनुदानाची टक्केवारी (किंमतीच्या) | कमाल आर्थिक मर्यादा (रु.) | अनुदानाची एकूण टक्केवारी (किंमतीच्या) | एकूण कमाल अनुज्ञेय अनुदान मर्यादा (रु.) |
| 1 | ट्रॅक्टर | २५ | ४५,०००/ | २५ | ४५,०००/ | ५० | ९०,०००/ |
| २ | पॉवर टिलर (८ एचपीपेक्षा जास्त एचपीचे) | ४० | ४५,०००/ | १० | ११,२५०/ | ५० | ५६,२५०/ |
| ३ | स्वयंचलीत औजारे/ सयंत्रे रिपर पॅडीट्रान्सप्लांटर इ | २५ | ४०,०००/ | २५ | ४०,०००/ | ५० | ८०,०००/ |
| ४ | अ) विशेष शक्तीवर चालणारी सयंत्रे / औजारे | २५ | १५,०००/ | २५ | १५,०००/ | ५० | ३०,०००/ |
| | ब) विशेष शक्तीवर चालणारी सयंत्रे/औजारे | ४० | २०,०००/ | १० | ५,०००/ | ५० | २५,०००/ |
| ५ | मनुष्य चलित औजारे / सयंत्रे | २५ | २,०००/ | २५ | २,०००/ | ५० | ४,०००/ |
| ६ | बैलचलित औजारे | २५ | २,५००/ | २५ | २,५००/ | ५० | ५,०००/ |
| ७ | ट्रॅक्टर/ पॉवर टिलर चलित औजारे | २५ | १०,०००/ | २५ | १०,०००/ | ५० | २०,०००/ |
| ८ | पॉवर थ्रेशर | २५ | १०,०००/ | २५ | १०,०००/ | ५० | २०,०००/ |
| ९ | डिझेल / इलेक्ट्रीक पंपसेट | ५० | १०,०००/ | नाही | नाही | ५० | १०,०००/ |
| १० | पीक संरक्षण औजारे | | | | | | |
| | अ) मनुष्य चलित | २५ | ८००/ | २५ | ८००/ | ५० | १,६००/ |
| | ब) शक्ती चलित | २५ | २,०००/ | २५ | २,०००/ | ५० | ४,०००/ |
| | क) ट्रॅक्टर मांऊण्टेड | २५ | ४,०००/ | २५ | ४,०००/ | ५० | ८,०००/ |

वरीलप्रमाणे नमूद औजारांची किंमत विचारात घेवून अनुदानाची टक्केवारी व उच्चतम अनुदान मर्यादा या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम अनुदानासाठी अनुज्ञेय राहील. जिल्हा निहाय अनुदान वाटप सोबत सहपत्रीत केलेले आहे. योजनेचा मासिक प्रगती अहवाल प्रत्येक महिन्याच्या दहा तारखेपर्यंत नियमितपणे कृषि आयुक्तालयात पाठविण्यात यावा.

**स्वाक्षरीत/**
**संचालक**
**विस्तार व प्रशिक्षण**
**कृषि आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य, पुणे**